# मार्च २०१५



# संवादकीय - मार्च २०१५

कॉ. गोविंदभाई पानसरेंच्या निधनाची बातमी पहाटे पहाटे कळली आणि साऱ्याच विचारी जगाला मोठा धक्का बसला. मन विषण्ण झाले. आधी दाभोलकर. मग पानसरे. आता पुढे कोण? असा प्रश्न पुढे ठाकला. ‘तुम्ही माणसाला मारू शकता पण त्याच्या विचारांना नाही’ असे म्हणत आपण आपल्या दु:खावर फुंकर घालून घेतली. पानसरेंचे समतेचे, सहिष्णुतेचे, तार्किकतेचे विचार कुणाला तरी पटले नाहीत म्हणून त्या व्यक्तींनी पानसरेंना गोळ्या घातल्या. एखाद्याचे विचार पटले नाहीत त्याला मारून टाकणे हा एक मार्ग. न पटणाऱ्या विचारांना विचारांनी खोडून काढणे हा दुसरा मार्ग किंवा वेगवेगळ्या अनेक विचार प्रवाहांना या समाजात जागा आहे असे म्हणून आपण आपल्या जगात सुखात राहणे हा तिसरा मार्ग. अजूनही अनेक मार्ग असतील. परंतु खुनी व्यक्ती यापैकी पहिलाच मार्ग स्वीकारतात. कारण हा सर्वात सोपा मार्ग आहे. इतर मार्गांसाठी स्वतः विचार करावा लागतो आणि नेमके हेच कसे करायचे हे आपला समाज विसरला आहे.

याचे मूळ शोधता आपण आपली बाल संगोपनाच्या व शिक्षणाच्या पद्धतीपाशी येऊन थांबतो. प्राचीन ग्रीक तत्वज्ञ सॉक्रेटिस व त्याचे विद्यार्थी यांच्यातील संवाद, प्रश्नोत्तरे व चर्चा सुप्रसिद्ध आहेत. ती प्रश्नोत्तरे वाचली तर आपल्या लक्षात येईल की अशा प्रकारच्या शिक्षणातून स्वतंत्र, चिंतनशील, शोधक वृत्तीचा व तार्किक विचार करणारा विद्यार्थी तयार होतो. या संवादात गुरू आणि शिष्य या दोघांनी एकमेकांच्या बुद्धीचा, विचारांचा व तात्विक मांडणीचा आदर केलेला दिसतो. आज कुठे आहे हा संवाद? अगदी विरुद्ध, न पटणारे असले तरी विचारांना विचार म्हणून दिलेले स्थान? तसा आपल्या बाल-संगोपन व शिक्षणात संवाद फारसा कधीच नव्हता. एकाने ज्ञान किंवा उपदेश देणे आणि दुसऱ्याने ते विनातक्रार, काही प्रश्न उपस्थित न करता स्वीकारणे अशीच शिकण्याची पद्धत राहिली आहे. परंतु रोजच्या जगण्यातून, दैनंदिन कामकाजातून मुले जबाबदाऱ्या घ्यायला व स्वयंशिस्तीने वागायला शिकत असत. घरातील लोकांच्याही मुलांकडून दरवर्षी चांगले पास होणे, लिहिणे-वाचणे-हिशोब करण्याची कौशल्ये असणे व वागण्या-बोलण्याची तमीज असणे यापेक्षा अधिक अपेक्षा नसत. त्यामुळे विचार करायला, हाताने काही करून बघायला, मनन करायला मुलांना अवकाश असे.

परंतु गेल्या २-३ पिढ्यांमध्ये जीवनशैली व कुटुंबव्यवस्था बरीच बदलली आहे. मुलांकडून असणाऱ्या अपेक्षा, इंग्रजी माध्यमाचा हव्यास, तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे सहज उपलब्ध असणारा टी.व्ही., मोबाईल, व्हीडिओ गेम्स यामुळे शालेय वयाची मुले व पालक यांच्यातील तणावाची पातळी खूपच वाढली आहे. संवाद खुंटला आहे. मूल्ये, संस्कार, जबाबदारी घेणे, शिस्त व शालेय विषय हे सारेच शिकविण्यासाठी आज शाळेकडे बोट दाखवले जाते.

ताण वाढला की विचार करणे बंद होते हे मज्जा-संशोधनाने दाखवून दिले आहे. आपली मुले विचार करायला लागण्यासाठी आधी हा ताण कमी व्हायला हवा. त्यासाठी आपण मुलांचे ऐकायला हवे. लहान मूल जेव्हा काही सांगू किंवा विचारू पाहते तेव्हा बहुतेक वेळा त्याला गप्प बसवले जाते किंवा त्याची मस्करी, चेष्टा केली जाते किंवा 'कसा चुरू चुरू बोलतो' म्हणून फक्त वृथा कौतुक केले जाते. परंतु गंभीरपणे त्यांचे बोलणे किती वेळा ऐकले जाते?

मात्र मुलांचे ऐकण्याची क्षमता मोठ्यांच्या अंगी येण्यासाठी त्यांचा ज्ञानरचनावादावर(Constructivism) विश्वास हवा, वर्तनवादावर (Behaviourism) नव्हे. 'प्रत्येक मूल शिकण्यास सक्षम असते' या गृहितकावर विश्वास हवा. मूल मोठ्यांच्या मदतीने बऱ्या-वाईटाचा निर्णय करू शकते. त्यासाठी त्याला बक्षिसाची लालूच दाखवावी लागत नाही की माराच्या शिक्षेचा धाक घालावा लागत नाही. मात्र वर्तनवादावर विश्वास असेल तर मुलांना विचार करायला व त्याबद्दल बोलायला उद्द्युक्त करण्याऐवजी 'बोलती बंद करण्याचा' हिंसेचा मार्गच अंगिकारला जातो. जिथे मुले रोज उठून शाब्दिक किंवा शारीरिक हिंसाच अनुभवतात ती पुढे जाऊन कुठल्याही प्रश्नाचे उत्तर हिंसेतच शोधणार नाहीत का?

कॉ. पानसरेंना सर्वात योग्य असा अखेरचा सलाम मग हाच असेल की प्रत्येक विचारी पालकाने व शिक्षकाने मुलांविरुद्ध शाब्दिक व शारीरिक हिंसा करणे बंद केले पाहिजे. शिवाय आज तंत्रज्ञानाच्या मदतीमुळे माहिती सहज उपलब्ध आहे. त्यामुळे आपल्या शिक्षणातून ती देण्याऐवजी मुलांना आजूबाजूला घडणाऱ्या घटनांविषयी, शिकण्याविषयी, वाचलेल्या मजकुराविषयी विचार करायला, मत मांडायला, प्रश्न विचारायला प्रोत्साहन द्यायला हवे. नव्हे मुलांचे संगोपन व शिक्षणाचा सारा ढाचाच आमूलाग्र बदलून टाकायला हवा.

# श्रम हाच जीवनाचा स्रोत

सोमीनाथ घोरपडे

समताधिष्ठित समाजाचे स्वप्न भारतीय राज्यघटनेने पाहिले आणि हजारो वर्षांची विषमता गाडून वर्गहीन, जाती-वर्णहीन मानवी समाज घडवण्यासाठी घटनाकारांनी राज्यघटना देशाकडे सुपूर्द केली. घटनेच्या आधाराने भारतीय समाजातील उच्च-नीचता, स्पृश्य-अस्पृश्यता, जाती-पोटजाती नष्ट करून समाजव्यवस्था समान पातळीवर आणण्याचे प्रयत्न झाले. परंतु आजही ते सफल होऊ शकले नाहीत. सिंधू आणि गंगा नदी खोऱ्यातील मूळ अनार्य रहिवासी आज वेगवेगळ्या जाती – जमातींमध्ये विखुरले आहेत. ते मूलतः सुसंस्कृत, शांतताप्रिय, शेती करणारे, धरणे बांधणारे, स्थापत्यविशारद, गोपालक, शेतकरी व कारागीर होते. त्यांच्या सुपीक शेतांमधून मिळणाऱ्या धान्यामुळे समाज जगत होता. त्यांनी निर्माण केलेल्या निरनिराळ्या कलाकुसरीच्या वस्तू, भांडी, आकर्षक घरे व फर्निचर वापरत होता. गावगाड्यातील या हाताने काम करणाऱ्या लोकांनी कायम स्वतःला श्रेष्ठ समजणाऱ्या पूजा-पठण करणाऱ्या लोकांची सेवा केली आहे. कालानुरूप साधने, पद्धती बदलल्या पण या कष्टकरी लोकांचे सेवेचे व्रत काही थांबले नाही.



गावगाड्यातील या जाती-जमातींचे समाजजीवन, ते करत असलेले काम, त्यातील ज्ञान, विज्ञान आणि कौशल्ये याची खोलवर जाऊन माहिती घ्यावी आणि ते काम प्रत्यक्ष कृतीतून करून पहावे म्हणून कमला निंबकर बालभवनने या वर्षी ‘श्रम हाच जीवनाचा स्रोत’ हा विषय वार्षिक प्रकल्पासाठी घेतला. कमला निंबकर बालभवन ही फलटण येथील संविधानिक मूल्यांचा पुरस्कार करणारी प्रयोगशील शाळा आहे. अगदी स्थापनेपासूनच विद्यार्थीकेंद्री असणारी व मुलांच्या स्वानुभवाबरोबर कृतियुक्त शिक्षणाच्या भक्कम पायावर उभी असणारी शाळा हीच तिची ओळख आहे. कमला निंबकर बालभवनच्या विविधांगी उपक्रमांमधील अत्यंत महत्त्वाचा उपक्रम म्हणजे वार्षिक प्रकल्प. वार्षिक प्रकल्पांतर्गत फलटणचा इतिहास, बालकांचे हक्क, महापूर, हिंसा, दुष्काळ असा एखादा पर्यावरणीय किंवा समाजशास्त्रीय विषय घेऊन त्याचा इयत्ता पहिली ते नववीचे सर्व विद्यार्थी सर्वांगाने अभ्यास करतात. समाजात फिरून प्रत्यक्ष डोळ्याने पाहणे, लोकांशी बोलणे, सर्वेक्षण करणे अशा माध्यमातून तसेच पुस्तके, संगणक यातूनही माहिती मिळवून ती चित्रे, प्रतिकृती, कविता, माहिती यांच्या माध्यमातून प्रदर्शनाच्या रूपात सादर केली जाते.

‘श्रम हाच जीवनाचा स्त्रोत’ या विषयांतर्गत मुलांनी मातीकाम, दगडकाम, कातड्याचे काम, न्हावी काम, ओतारी व लोहार काम, कपडे शिवणे, धोबी काम, पोत ओवणे, सोन्याचे दागिने बनवणे, शेती, पशुपालन, तेल काढणे, बांधकाम, सुतारकाम, शिंदीच्या फड्यांचे झाडू, टोपल्या, मुसक्या, वाघरे बनवणे अशा अनेक कामांची माहिती घेतली. त्या त्या व्यवसायातले ज्ञान व विज्ञान, त्या व्यवसायाचा इतिहास आणि भूगोल जाणून घेण्याचा मुलांनी प्रयत्न केला. निव्वळ माहिती घेण्याशीच न थांबता मुलांनी प्रत्यक्ष काम करण्यावर भर दिला. आठवडाभर केलेल्या कामाने मुले लगेच कुशल शिंपी, कुंभार, सुतार बनणार नाहीत. पण माती, वनस्पती, लाकूड, कापड, दगड, चामडे अशा विविध नैसर्गिक पदार्थांशी येणाऱ्या प्रत्यक्ष संबंधातून, ते हाताळण्यातून, त्यांचे गुणधर्म जाणून घेण्यातून, त्यापासून वापरायोग्य असे काहीतरी बनवण्यातून मुलांची एक चांगली वैज्ञानिक व समाजशास्त्रीय समज तयार होते.





या प्रकल्पांतर्गत कुंभारकामाची माहिती इयत्ता पहिलीने गोळा केली. त्यांनी गटागटाने कुंभार टेकाला भेट दिली. आपण कसे कसे गेलो त्याचा नकाशा काढून प्रदर्शनात मांडला. मातीची योग्य

निवड कशी करायची, त्या मातीत गुठळ्या होऊ नयेत म्हणून भाताचे किंवा गव्हाचे तूस, राख, वाळू व कोळशाची पूड टाकायची, मातीची भांडी भाजण्याच्या भट्ट्यांचे प्रकार, मातीची भांडी व वस्तू भाजताना कोणत्या भांडयाला किती तापमान ठेवावे अशी विविध प्रकारची माहिती मुलांनी गोळा केली. आकर्षक उठाव चित्रे, प्रत्यक्ष बनवलेल्या मातीच्या बैलांपासून चुली, सुगडी, पणत्या अशा वस्तू प्रदर्शनात मांडल्या. भांडी भाजण्याच्या भट्टीची एक प्रतिकृतीही तयार करून ठेवली. पहिलीने मातीकामाबरोबच दगड कामाची माहितीही गोळा केली. दगडाच्या खाणीना भेट दिली. दगडाचे प्रकार पाहिले. बांधकामाचे दगड व पाट्या-वरवंट्याचे दगड पहिले.

इयत्ता दुसरीने माळीकाम व फूल व्यवसायाची आणि लाह्या, चणे, फुटणे भाजणाऱ्या भोयांची माहिती मिळवली तर तिसरीच्या वर्गाने न्हावी कामाचे महत्त्व व पारावरच्या न्हाव्यापासून पार्लरपर्यंतचा न्हावी कामाचा प्रवास विषद केला. इयत्ता ४ थी ने कातडी-कामाची माहिती तर इतिहासासकट मिळवलीच. शिवाय शाळेत चांभारकाम दाखवायला आलेल्या मामांच्या नजरेखाली फाटक्या चपला शिवल्या तर कोणी कातड्याच्या तुकड्यांवर टाके घातले. कागदाच्या लागद्याची ऐरण, टोच्या, रापी, पक्कड, हस्ती, चांभारी इत्यादी हत्यारे बनवली. पूर्वी फलटणमध्ये कातडी कमविण्याचा कारखाना होता. तो पाहून १०-१२ वर्षांपूर्वीच्या प्रकल्पात त्या वेळच्या विद्यार्थ्यांनी त्याची माहिती लिहून, चित्रे काढून ती सांभाळून ठेवली होती. त्यावरून या वर्षीच्या चौथीच्या मुलांनी आपली माहिती मिळविली. चौथीची काही मुले पोत ओवणाऱ्या पटवेकऱ्यासमोर बसून पोत ओवण्याची कलादेखील शिकली. मग बालवाडीच्या बाहुली घरासाठी माळा, मुंडावळ्या, मनगट्या असे मण्यांचे दागिने बनवले.

इयत्ता पाचवीच्या विद्यार्थ्यांनी शिवणकाम करून हातरुमाल, अंगडी-टोपडी, परकर, पोलके असे अनेक कपडे शिवले. शाळेत झाडलोटीचे काम करणाऱ्या ताई आठवडाभर त्यांना शिलाई शिकवीत होत्या. अनेक पालकांनी आपल्या मुलांना मशीन शिलाई सुद्धा शिकवली. मोठ्या मोठ्या शिंप्यांच्या दुकानांना भेटी देऊन एम्ब्रॉइडरी मशीन्स, काजाच्या मशीन्स, रफूच्या मशीन्स असे मशीनचे प्रकार मुलांनी पाहून घेतले. कापड दुकानांना भेटी देऊन कापडाचे विविध प्रकारही पाहिले व जमा केले.

इयत्ता सहावीने गवळी व धनगर मंडळींचे भटके पारंपरिक पशुपालन पहिले व नंतर यंत्राने धार काढणारे आधुनिक गोठेही पहिले. गाई-म्हशींच्या दुधातील फरक व दुधातील भेसळ यांचा अभ्यास केला. दोन-तीन दिवस जाऊन मुले शेण-गोठा करणे, जनावरे धुणे, जनावरांना खायला घालणे अशी छोटी-मोठी कामे एका पालकांच्याच छोटेखानी गोठ्यात जाऊन करीत होती.

इयत्ता सातवीने लोहारांना भेट देऊन विळा बनवणे, कुऱ्हाडीला धार लावणे इत्यादी प्रक्रियांमागील विज्ञान शिकून घेतले. काहींनी भाता चालवून बघितला तर काहींनी घण उचलून बघितला व लोहारकाम फारच अवघड असते असे म्हणून सुतारकाकांबरोबर चार दिवस काम केले. मोडक्या खुर्च्या दुरुस्त केल्या. टेबलाचे प्लायवुड बदलले. पिनबोर्ड दुरुस्त केले. बाकांचे नट-बोल्ट आवळले. तसेच इयत्ता पाचवीच्या मुलांना प्रकल्पासाठी लागणारी वाळू चाळण्याची चाळणी तयार करून दिली. बालवाडीला ठोकळे तयार करून दिले.

इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांनी दोन दिवस जवळील एका सेंद्रीय शेतीला भेट देऊन शाश्वत शेतीची कल्पना समजावून घेतली. मृदा संधारणासाठीची नो-टिलची संकल्पना समजावून घेतली. निम्म्या वर्गाने दोन दिवस गुग्गुळच्या लागवडीसाठी रान तयार केले. तर उरलेल्या निम्म्यांनी शाळेतील कुंड्यांमधील माती बदलली.

इयत्ता नववीच्या वर्गातील एका मुलाच्या घरी शिंदीच्या पानापासून टोपल्या, केरसुण्या बनविण्याचा व्यवसाय करतात. ८-१० मुले त्यांच्या घरी दोन दिवस ती कला शिकत होती. फलटण परिसरात शिंदीची झाडे नाहीत. परंतु ६०-७० किलोमीटरवरील दौंड, कर्जत या गावांहून फडे आणले जातात. शिंदीच्या कोणत्या बागांमधून कोणी फडे आणायचे ते ठरलेले असते. फडे आणून रस्त्यावर वळवून साठवून ठेवले जातात. केरसुण्या बनवण्यापूर्वी पाणी मारून ते खिसले जातात. पिठाच्या गिरणीच्या पट्ट्याच्या तळहाताएवढ्या तुकड्यात खिळे ठोकून खिसणी बनवली जाते. पाने खिसून खिसून त्याचे काटे काढले जातात. काड्याही वेगळ्या होतात. पाने एकत्र करून, नायलॉनने बांधून त्याच्या केरसुण्या बनवतात. काड्यांच्या टोपल्या बनवतात. थोडक्यात वाया काहीच जात नाही. पूर्वी हे लोक वाखाच्या दोऱ्या विणत. आज मात्र प्लॅस्टिकचे तंगुस आणून, त्याच्या पट्ट्या कापून, वळून दोर बनवले जातात व त्यापासून गुरा-शेरडांना बांधायच्या मुसक्या, व धनगरांची वाघरे बनवली जातात. काही मुले-मुली मुसक्या बनवण्याच्या गाठी शिकली.

या प्रकल्पाच्या निमित्ताने मुलांनी या सर्व लोकांचे काम, त्यातील विज्ञान, तंत्रज्ञान व कौशल्ये यांचा अभ्यास तर केलाच पण ही सर्व कामे स्वतः करून पाहिली. यामुळे कोणतेही काम हलके नसते, ही सर्व कामे आपल्याला आनंद देतात, हे सर्व लोक काम करतात म्हणून आपण चांगले जीवन जगू शकतोय याची जाणीव त्यांना झाली.

नव्या समाजात एक गोष्ट अत्यंत ठळकपणे समोर येते ती म्हणजे तंत्रज्ञान व उद्योगधंद्यातील अगडबंब वाढ. जेमतेम गेल्या २००-२५० वर्षातील ही गोष्ट आहे. मानवाच्या साऱ्या इतिहासात इतकी वेगवान आणि व्यापक क्रांती कधीच घडली नव्हती. आज कारखान्यांमध्ये केले जाणारे सर्व व्यवसाय, तयार केल्या जाणाऱ्या सर्व वस्तू ४-५ पिढ्यांपूर्वी घराघरात तयार होत होत्या. कपडे शिवले जात होते, घोंगड्या विणल्या जात होत्या. बाजरी पिकवून दळून भाकरी थापली जात होती. मासे पकडले जात होते. घरे बांधली जात होती. लाकडाच्या खुंट्या, चौकटी बनवल्या जात होत्या. कच्च्या मालापासून वापरायोग्य वस्तूंपर्यंत सारा प्रवास डोळ्यादेखत घडत होता. एवढेच नव्हे तर घरातील प्रत्येक व्यक्तीचा त्या प्रवासात आपला आपला वाटा होता. अगदी घरातल्या ३ वर्षाच्या मुलाचाही. या प्रवासात मुले कामाच्या सवयी, स्वयंशिस्त शिकत होती. जबाबदारी घ्यायला शिकत होती. थोडक्यात समाजाचा एक उपयुक्त घटक म्हणून घडत होती. आजची पिढी या अनुभवापासून दूर गेली आहे. परंतु काही काळासाठी का होईना, त्यांना तो अनुभव उपलब्ध करून देणे या प्रकल्पाने साध्य झाले.

या प्रकल्पाच्या दोन आठवड्यांच्या कालावधीत शाळेतील वातावरण पूर्ण बदलून गेले होते. सर्व मुले मधमाशीसारखी कामात होती. एकमेकात गप्पा मारत प्रत्येकाचे आपापले काम चालले होते. सर्वत्र एक प्रकारचे चैतन्य जाणवत होते. अभ्यासापेक्षा या कामात वेगळे काय होते? कितीही जरी म्हटले की मुले स्वतःचे ज्ञान स्वतः रचतात, तरी बहुसंख्य वेळा अध्यापन व्याख्यान पद्धतीने होते. त्यामुळे मुले कंटाळतात. हे मी का ऐकायचे? असा प्रश्न मुलांच्या मनात नक्कीच येत असणार. मात्र प्रकल्प काळात दोन आठवडे शाळेतील चैतन्य काही वेगळेच होते. सर्व मुले मनात काही हेतू धरून विशिष्ट निष्पत्तीच्या दिशेने एकमेकांच्या सहकार्याने काम करीत होती. आजची आपली शिक्षण पद्धती ही मुळातच एकेकट्याच्या उन्नतीचा मार्ग दाखवते. याउलट निर्मिती प्रक्रिया ही साऱ्या गटाच्या आणि पर्यायाने साऱ्या समाजाच्या उन्नतीच्या मार्गाचा पुरस्कार करते. म्हणूनच तंत्र युगातही हाताने काम करण्याचे महत्त्व शालेय शिक्षणामध्ये आवर्जून विषद करायला हवे.

सोमीनाथ घोरपडे
bhimai05@gmail.com
7387145407

# परंपराजन्य श्रमघृणा आणि श्रमप्रतिष्ठा

किशोर दरक

*किशोर दरक हे शिक्षणशास्त्राचे अभ्यासक व चिकित्सक आहेत. अनेक संशोधन प्रबंधांबरोबरच विविध वृत्तपत्रे व मासिकांमधूनही त्यांनी शिक्षण व समाजशास्त्र या विषयांवर लेखन केले आहे. शिक्षणाचे सांस्कृतिक राजकारण, अभ्यासक्रम आणि पाठ्यपुस्तके यांच्या अभ्यासात त्यांना विशेष रस आहे. भारत ज्ञान विज्ञान समुदायासोबत त्यांनी एक दशकाहून अधिक काळ शिक्षक प्रशिक्षक म्हणून काम पाहिले आहे.*

'अरे, तुझी बायको/आई घरात नाहीये? मग तू जेवायचं काय करतोस?" भारतीय मध्यमवर्गीय समुदायात कुठल्याही पुरुषाला कधीही विचारला जाणारा प्रश्न. त्यामागं काही गृहितकं- एक म्हणजे स्वयंपाक हे स्त्रियांचं जन्मसिद्ध काम आहे (हे फक्त काम आहे, कौशल्य किंवा ज्ञान नाही), दुसरं म्हणजे हे काम पुरुषांनी करायचं नसतं, तिसरं म्हणजे हे काम ते करू शकत नाहीत, चौथं म्हणजे स्त्रीवर्गाच्या अनुपस्थितीत क्वचित प्रसंगी हे काम करायला हरकत नाही (कुणाची?), इत्यादी इत्यादी. यादी अजूनही लांबवता येईल (नव्हे, ती तशी आहेच.) पण यामागचं सर्वात महत्त्वाचं सूत्र म्हणजे श्रमांचा अनादर.

भारतासारखी बहुविधता असलेल्या देशात जात आणि लिंगभावाधारित भेदभाव यामुळं श्रमाच्या अनादराची परंपरा हे, जिला कशाला भारतीय संस्कृती म्हणतात, तिचं व्यवच्छेदक लक्षण बनलंय. शारीरिक श्रम करणं, हातानं काम करणं, हे माणसाच्या नीच कुलीनपणाचं, नीच योनीचं द्योतक आहे. 'बुद्धिजीवी' आणि 'श्रमजीवी' किंवा 'व्हाईट कॉलर्ड' आणि 'ब्ल्यू कॉलर्ड' आणि हे कोटिक्रम (catagories) वासाहतिक जगात जन्मलेले नाहीत. ब्रिटिशपूर्व काळापासून भारतात हे कोटिक्रम अस्तित्वात आहेत आणि ते 'गुण्यागोविंदाने' सहअस्तित्व राखून आहेत, असा दावा बुद्धिजीवी वर्गाकडून केला जातो.

आपण भारतीय असल्याचे काही महत्त्वाचे समाज-मानसशास्त्रीय (socio-psychological) दर्शक आहेत. पाकिस्तान द्वेष, जन्माधारित उच्च-नीचता स्वीकारण्याची पद्धत, 'प्राचीन संस्कृती'असे शब्द ऐकले की दाटून येणारा कंठ किंवा चढलेले स्फुरण यासारख्या दर्शकांच्या बरोबरीनं एक महत्त्वाचा दर्शक म्हणजे श्रमघृणा. श्रमांना अप्रतिष्ठित समजलं जातं किंवा त्याबद्दल अप्रीती किंवा नीसरता दाखवली जाते असं वरकरणी वाटत असलं तरी त्या सगळ्याच्या तळाशी श्रमाबद्दल या कमालीचा तिरस्कार किंवा टोकाची घृणा असते. श्रमाबद्दलचा हा दृष्टिकोन श्रमणार्यांकडं बघण्याच्या समाजाच्या दृष्टीतदेखील उतरतो. उदा: 'पन्नास हजार रुपये प्रमाणिकपणे परत केल्याबद्दल भंगारवाल्याचा (किंवा रिक्षावाल्याचा, किंवा फेरीवाल्याचा इत्यादी) सत्कार' अशी एक बातमी येते. त्याच पेपरात 'विनयभंग (किंवा बलात्कार) केल्याबद्दल डॉक्टर (किंवा वकील किंवा प्राध्यापक इत्यादी) अमुक तमुक यांना दोन (किंवा सात) वर्षांची शिक्षा' अशी बातमी आलेली असते. प्रामाणिकपणा दाखविणार्या व्यक्तीचा उल्लेख एकेरी आणि गुन्हा करणार्याचा उल्लेख आदरार्थी करणारी भाषा आपल्या इतकी अंगवळणी पडलीय की यात काही गैर आहे, असा विचारही आपल्याला शिवत नाही. का बरं? श्रमाचं काम करणार्या व्यक्तिला काही डिग्निटी असू शकते हे आपल्याला जात-लिंग उतरंडीवर आधारित समाज शिकूच देत नाही.

खरं तर वेगवेगळ्या समाज घटकांनी वेगवेगळी कामं केल्यानं श्रमविभागणी होऊन समाजाचा गाडा व्यवस्थित चालायला मदत होते, असं समर्थन करत जात आणि लिंगाधारित व्यवस्थेचं समर्थन किंवा उदात्तीकरण केलं जाणं काही नवीन गोष्ट नाही. (अशा 'सनातन' विभाणीच्या अर्वाचीन समर्थकांची संख्या मे २०१४ नंतर अचानक वाढू लागलीय.) पण आधुनिकतेचा कितीही आव आणला, विचारसरणीचा कितीही तोरा मिरवला तरी जोवर श्रमांप्रतीचा 'नैसर्गिक' अनादर ओहोटीला लागत नाही तोवर भारतीय समाजाला आधुनिक मानता येणार नाही, असं अनेक विचारवंत मानतात.

समाजात असणारी ही श्रमघृणा साहजिकच शिक्षणव्यवस्थेत, शालेय व्यवहारांत उतरते. ब्रिटिशांनी या देशात अनेक 'सुधारणा' कायद्याने आणण्याचा प्रयत्न केला आहे. सती बंदी, विधवा पुनर्विवाह, संमती वयाचा कायदा अशा अनेक कायद्यांना समाजधुरीण पुरुषांनी (म्हणजे त्या काळात तर मुख्यत: ब्राह्मण पुरुष) 'ही आमच्या धर्माधिकारांमध्ये, सामाजिक संरचनेमध्ये परकीयांची ढवळाढवळ आहे' असं म्हणून ठाम विरोध केला होता. पण ब्रिटिशांच्या शिक्षण व्यवस्थेला मात्र असा विरोध सनातन्यांकडून झाला नाही. याचं एक कारण शिक्षणोत्तर काळात प्राप्य असणारी नोकरी हे जरी असलं तरी त्या शिक्षणात भारतीय ब्राह्मणी, पुरुषसत्ताक मानसिकतेच्या विरोधात जाणारं काहीही नव्हंत, हे विसरून चालणार नाही. इतरांच्या श्रमांवर पोसला जाऊन केवळ तोंडाची वाफ दवडून सत्ता उपभोगणार्या वर्गाला श्रमविरहित शिक्षण व्यवस्था म्हणजे आपल्या (फायद्याच्या) परंपरेचं पुनर्नवीकरण वाटलं असणार! शिक्षणाची, शाळेची तीच पद्धत सार्वत्रिक बनली, कराण शारीरिक श्रमांना उच्चरवात धिक्कारणारा समाज घटकच या व्यवस्थेचा फायदा उपभोगणारा पहिला घटक होता. १८८२ च्या हंटर आयोगासमोर निवेदन देताना महात्मा ज्योतिराव फुलेंनी सर्वांना सक्तीच्या शिक्षणाची मागणी केली होती. ते करत असताना शिक्षणात शेतीचा समावेश करण्याचा आग्रह त्यांनी धरला होता कारण त्यांच्या लेखी शेती आणि त्यामधले श्रम हे बहुसंख्य बहुजनांचं जिवंत सत्य होतं. जोवर ते जीवन शिक्षणात येणार नाही तोवर शिक्षण अर्थपूर्ण होणार नाही अशी महात्मा फुल्यांची धारणा होती.

श्रम करणं, हाताने काम करणं, या गोष्टींचा शिक्षणात समावेश करण्याची महत्त्वाची मागणी किंबहुना त्याचा पुरस्कार महात्मा गांधींनी 'नई तालीम' या प्रयोगाद्वारे केली होती. शिक्षण म्हणजे मन, मनगट आणि मेंदू यांच्या समन्वयातून घडणारी प्रक्रिया आहे या मान्यतेवर आधारित 'नई तालीम'नं श्रमाला शिक्षणाचं अविभाज्य भाग मानलंय.

स्तरित समाजांमध्ये त्या समाजामधल्या खालच्या स्तरांच्या कोणत्याही कृतीला, सवयीला किंवा समजुतीला कनिष्ठ किंवा नीच दर्जाचं मानलं जातं. परंपरेने श्रम करण्याचं 'कर्तव्य' स्त्रिया, दलित, आदिवासी यांना दिलेलं असल्यामुळं शारीरिक श्रम कमी दर्जाचे मानले जातात. ज्येष्ठ विचारवंत कांचा आयलाया यांच्या म्हणण्यानुसार श्रमघृणेची वृत्ती आपल्या समाजमनात इतकी भिनलीय की जी व्यक्ती कमीत कमी श्रम करते ती जास्तीत जास्त प्रतिष्ठित मानली जाते. साहजिकच कुणाला उच्चभ्रू, उच्च दर्जाचं व्हायचं असेल तर श्रमाला सोडचिठ्ठी ही जवळपास पूर्वअट ठरते.

हातानं काम करणारा वर्ग आणि बुद्धी वापरणारा वर्ग (जणू हातानं काम करताना बुद्धी वापरावी लागत नाही) अशी स्पष्ट विभागणी असणार्या समाजात श्रम करणार्यांमध्ये निसर्गत: बौद्धिक, नैतिक कुवत कमी असल्याचं मानलं जातं. 'फळविक्रेत्याची मुलगी बोर्डात आठवी' किंवा 'गरीब असूनही प्रामाणिक' अशा गुणांच्या बातम्या बनवतात कारण त्यामध्ये अपेक्षाभंगाचा भाव असतो. म्हणजे गरीबी आणि प्रामाणिकपणा किंवा श्रम आणि बुद्धी अशा गोष्टी एकत्र नसतील अशी आपली अपेक्षा असते. या सामाजिक समजेचा परिणाम आपल्या शिक्षणक्रमाच्या आखणी, अंमलबजावणी आणि व्यवस्थापनावर होतो.

खरं तर कृतीतून म्हणजे प्रत्यक्ष हातानं काम करून शिकण्याने जे आपण शिकतो ते दीर्घकाळ स्मरणात राहू शकतं, समजेचे अनेक पदर उलगडून दाखवू शकतं,पण अमूर्तता म्हणजे ज्ञान आणि श्रम म्हणजे काम किंवा फार फार तर कौशल्य असा समज सार्वत्रिक असल्यामुळं आणि शिक्षणातून 'ज्ञानार्जन' (म्हणजे माहिती मिळवणं) करायचं असल्यामुळं हातानं काम करण्याची पेडॅगॉजी (शिक्षणशास्त्र) शाळेबाहेरच ठेवली जाते. 'राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा-२००५' च्या म्हणण्यानुसार स्वातंत्र्यानंतर राष्ट्रीयीकरणाच्या (indigenisation) नावाखाली आपण शिक्षणाचं ब्राह्मणीकरण आणि संस्कृतीकरण केलयं. याचं महत्त्वाचं कारण जात-पितृसत्ताक उतरंड व्यवस्थेला, श्रमाचा तीव अनादर करणार्या परंपरेला आपण प्रमाण मानलंय, हे असावं.

स्त्रिया, दलित, आदिवासी, अल्पसंख्य समुदाय इत्यादी उत्पादक समाजघटकांच्या श्रमांची चर्चा, त्यांची आर्थिक आणि सामाजिक मूल्य निश्चिती, त्या श्रमांच्या आधारे झालेली सामाजिक प्रगती आणि जर ते श्रम उपलब्ध नसते तर होऊ शकणारी संभाव्य पीछेहाट या सर्व गोष्टी शाळांमध्ये समाविष्ट केल्या जायला हव्यात. श्रम करणे हे प्रत्येकाच्या जीवनाचं सार आहे, फक्त काही समाजघटकांचं प्रारब्ध नव्हे हे मुलांच्या समोर, नव्या पिढीसमोर प्रत्यक्ष कृतीतून मांडायला हवं. १९८६ च्या 'राष्ट्रीय शिक्षण धोरणा'त श्रमप्रतिष्ठा हे एक महत्त्वाचं मूल्य मानलं गेलंय. हे मूल्य शाळांमधून शिकवायला हवं असं राष्ट्रीय धोरण म्हणतं. पण श्रमप्रतिष्ठा शिकवण्याचा आपला दृष्टिकोन फक्त सैध्दांतिक (theoretical) आहे. श्रमप्रतिष्ठेतून जातीय किंवा स्त्री-पुरुष उतरंडीला प्रश्न विचारायचे असतील, त्या व्यवस्थेला हादरे देऊन बदल घडवायचा असेल तर प्रत्यक्ष अध्यायनानुभवातून श्रमविचार, श्रमआचार आणि श्रमप्रतिष्ठा असा मार्ग स्वीकारावा लागेल. एरवी श्रमघृणेने बरबटलेल्या आपल्या समाजात मोबाईलवर फुटबॉल खेळण्याला स्पोर्ट आणि यूट्यूबवर व्हिडिओ पाहून पोहण्याचा सराव करण्याला (पाण्यात नव्हे, कंप्यूटरसमोर बसून) अॅक्टिव्हिटी म्हणण्याची पद्धत रुळतीय की!

किशोर दरक
9423586351
kishore_darak@yahoo.com

# कामातून विज्ञान आणि सामाजिक जाणीव

वैशाली गेडाम



*वैशाली गेडाम या जि. प. उच्च प्राथमिक शाळा, मसाळा, चंद्रपूर येथे गेली १७ वर्षे प्राथमिक शिक्षक म्हणून कार्यरत आहेत. त्यांचा बालमानसशास्त्र व भाषा शिक्षणाबाबतचा विशेष अभ्यास आहे. 'चिंगीला बनायचंय वैज्ञानिक' आणि 'माझे प्रगतिपुस्तक- शोध शांतीचा' या पुस्तकांचे लेखन त्यांनी केले आहे. शिवाय अनेक मासिके व वृत्तपत्रांतूनही त्यांचे शिक्षणविषयक लेख प्रकाशित झाले आहेत. आपल्या शिक्षणपद्धतीत योग्य तो बदल केल्यास व त्यात शास्त्रीय व*

*बालमानसशास्त्रीय दृष्टिकोन आणून त्या मार्गाने शिक्षण कार्यान्वित केल्यास शिक्षण घेतलेला माणूस शांत व आनंदी होणे शक्य आहे असे त्यांनी आजपर्यंत केलेल्या प्रयोगांतून व अभ्यासातून त्यांना वाटते.*

**२७ ऑक्टोबर २०१०**

पहिलीतील चेतन माझ्याकडे आला व विचारले, ”टीचरजी, माती टाकू का?“
मी विचारले, “कोठे?”
“मुंग्या निंगल्यानं जी त्याच्यावर.”
मी “नको” म्हणाले.
तो पुढे म्हणाला, “मी झाडून टाकू का?”
त्याची लालसा पाहून मी झाडून टाक म्हणाले. तो खराटा घेऊन गेला व वर्गाबाहेरचा परिसर स्वच्छ करू लागला. त्याला बघून कुणाल त्याच्या सोबतीला गेला.

**१३ नोव्हेंबर २०१०**

परिपाठ आटोपून वर्गात आल्या आल्या सौरव, बाळू आणि प्रज्वलने कुदळ, फावडे हातात घेतले. ते बराच वेळ त्यांच्या मळयात काम करीत होते. पाहिलीतील चेतन, दुसरीतील निकिता यांनी पाणी आणून रोपांना टाकले. १०.४० वाजता शाळा सुटली. सौरव आणि बाळू थांबले काम करत. पहिलीतील परमेश्वर मला म्हणाला, “मॅडमजी, मी पण थांबतो काम करासाठी.” तोही त्यांच्याबरोबर काम करू लागला. गावातील एका बाजूचे सांडपाणी आमच्या वर्गासमोरून वाहते. त्या पाण्याला या मुलांनी आपल्या मळयाकडे वळविले.

**३१ डिसेंबर २०१०, शुक्रवार**

मी मुलांना वर्ग स्वच्छता करू म्हणाले. त्यासाठी वर्गसभेचे आयोजन केले. एकेका मुलाने उठून वर्ग स्वच्छता कशी राखता येईल ते सांगितले. १२.३० वाजता आम्ही वर्गसफाईला लागलो. मला काही सांगावेच लागले नाही. फारशा सूचनाही द्याव्या लागल्या नाहीत. कोणी जाळया, जळमटे काढू लागले. कोणी वर्गातील साहित्याची रचना बदलवू असे म्हणून त्या कामाला लागले. माझी बॅग, पाण्याची बॉटल, टिफिनसाठी त्यांनी एक जागा निश्चित केली.
नंतर त्यांचे गट केव्हा झाले आणि आपापला कोपरा निश्चित करून ती जागा सजविण्याच्या कामी कधी लागले ते मला कळलेच नाही. माझ्याजवळ मुलांचे कौतुक करण्यासाठी शब्दच नाहीत. त्यांच्या कल्पनाशक्ती, वस्तूंचा वापर करण्याची क्षमता, चिकाटी साऱ्याच गोष्टी अद्भुत आहेत.

**८ ऑगस्ट २०११, सोमवार**

शाळेत जातांना मी शोभेच्या व फुलांच्या झाडांची रोपे नेली होती. शाळेत पोचल्याबरोबर तीन चार मुलांना सोबत घेऊन मी बाग तयार करण्याच्या कामाला लागले. परिपाठ झाल्यानंतर लगेच मी पुन्हा त्याच कामाला लागले. माझे दोन्ही वर्ग व ७ वी तील काही मुले सोबतीला होती. आम्ही दुपारी २ वाजेपर्यंत सलग काम केले.

मला लावलेल्या झाडांना कुंपण करायचे होते. मुलांनी बाभळीच्या काट्या तोडून आणल्या. मी दोन चार मुलांना सोबतीला घेऊन कुंपण बनविले.

सातवीतील राकेश म्हणाला, “काय आमाला दिवसभर लिवालेस देते. एवढा तरास येते. दिवसभर वर्गात बसा लागते. मले आवडत नाइ.”

मी त्याच्या मताशी तत्काळ सामील झाले व त्याची बाजू घेतली. हे तो सकाळी मी शाळेत गेल्याबरोबर त्याला घेऊन झाडे लावण्याच्या तयारीला लागले तेव्हा म्हणाला होता. नंतर प्रार्थनेची वेळ झाल्यावर म्हणाला, “मॅडमजी, प्रार्थना झाल्यावर आमी वर्गात बसतो तवा तुम्ही मले काम करासाठी बोलवाजो.”

तो आज दिवसभर म्हणजे संध्याकाळी सव्वापाच वाजेपर्यंत काम करीत राहिला. सातवीतील महेश झाडांसाठी माती आणायला गेला तेव्हा त्याच्या पायाच्या अंगठयाला काच रुतून चांगलीच जखम झाली. खूप रक्त गेले. मी त्याचा पाय स्वच्छ करून जखम धुतली व औषध लावून पट्टी बांधली. तो पुन्हा कामासाठी तयार. ५ वाजेपर्यंत काम करीत राहिला. समाज म्हणतो आजकालच्या मुलांना अंगमेहनत नको. आळशी आहेत. काम करीत नाहीत. मुलांना काम प्रचंड आवडते. आम्ही अभ्यासाच्या नावाखाली त्यांचे हे मूल्य कायमचे मारून टाकतो.

**१८ ऑगस्ट २०११, गुरूवार**

शाळेत गेल्यावर मी खराटा घेऊन बाहेरचा परिसर स्वच्छ करू लागले. मला झाडताना पाहून पाचवीतील गौरव “द्या मॅडम मी झाडतो,” म्हणाला. मी त्याला खराटा दिला. मी दुसरा खराटा घेतला. पहिलीतील भीम फडा घेऊन झाडू लागला. अलिकडेच रस्त्याचे बांधकाम झाले. त्या बांधकामाची वाळू जी रस्त्यावर पसरली होती आणि वाळूचा ढीग उपसल्यावर जी अजून थोडी बाकी असते ती पूर्णपणे काढण्यासाठी आणि रस्त्यावरील चिखल, शेण काढण्यासाठी मी पाचवीतील युगंधरला फावडे आणायला सांगितले. तो फावडयाने रस्ता साफ करू लागला. त्याला पाहून तिसरीतील सागरने आपल्या घरून फावडे आणले. तोही या कामाला लागला. चौथीतील दोन मुली कचरा वेचायला आल्या. जरावेळाने आणखी दोघी आल्या. झाडणारे हात बदलविले गेले. सातवीतील भावना पण आली. तिने माझ्या हातून खराटा घेतला व झाडू लागली.

**१५ सप्टेंबर २०११, गुरूवार**

‘अग्नीचा वापर’ हा पाठ समजून घेता घेता शेवटाला येईपर्यंत मुलांच्या डोक्यात आपण मातीची भांडी बनवावी असा विचार आला. मुले मला म्हणाली, “मॅडम, चला आपण माती आणायला जाऊ.” मला मुलांची कल्पना आवडली. आम्ही माती आणायला गेलो. माती आणली. ढेकळे फोडली, माती गाळली, भिजवली. मुलांनी मस्त मातकाम केले. मुलांच्या कल्पनेला आणि आनंदाला उधाण आले होते.

**२१ डिसेंबर २०११, बुधवार**

माझा वर्ग आणि मी मागील दीड महिन्यापासून एक डोंगर बनवतोय. ते एक भूगोलाचं शैक्षणिक साहित्य आहे. मुलांना शैक्षणिक साहित्य या शब्दाची काही कल्पना नाही. माहीत असण्याचा प्रश्नही नाही. ती आपली पूर्ण मेहनत लावून डोंगर बनवत आहेत. डोंगरातून दोन दिवसांपूर्वी मुलांनी नदीचा उगम दाखविला. काल धरण बांधलं. आज त्या नदीवर पूल तयार

केला. दुसरीतील अनिकेतने आज डोंगरावर बिया पेरल्या. मुलांनी बालट्यांनी बोरवेलचं पाणी आणून डोंगरावर टाकलं आणि पुलाखालून पाणी वाहणं, धरण ओव्हरफ्लो होणं अनुभवलं. या गोष्टी मी सांगितल्या नव्हत्या. त्यांच्या मताने त्यांनी करून पाहिल्या.

**९ फेब्रुवारी २०१२, गुरूवार**

परिपाठ आटोपल्याबरोबर सागर आणि जय पुन्हा खड्डा खोदायला लागले. त्यांनी जवळपास ५ x ४ चौ. फुटाचा खड्डा केला आहे आणि आता त्याला आणखी खोल करत आहेत.
काही वेळाने मी खड्ड्याकडे गेले तर सागर एकटाच खड्डा खोदत होता पण आता त्याने त्या खड्ड्यात आणखी एक जवळपास बारा इंच व्यासाचा खोल खड्डा खणला होता. मी विचारले, ”हा खड्डा कशाला केला?“
तो म्हणाला, “टीचरजी, या खड्ड्यामंदी जेऊ टाकाचं अन् इकडं वारला कचरा टाकाचा.” म्हणजे त्याने असे केले होते. एका मोठया पसरट खड्ड्यात एक छोटा पण खोल खड्डा केला व त्यात त्याने ओला कचरा आणि सुका कचरा टाकण्याची वेगवेगळी व्यवस्था केली. मला वाटले, शाळांनी किती नुकसान केलेय, मुलांना बंद खोलीत शिक्षण देऊन. मुले किती प्रयोगशील आहेत!

**१० नोव्हेंबर २०१४, सोमवार**

शाळेत गेल्यावर काही मुले म्हणाली, “मॅडम, आपण आज गाव स्वच्छ करू.” मी हो म्हणाले. मग मुले गावाच्या स्वच्छतेचे नियोजन करू लागली. कचऱ्याची व्यवस्था कशी लावायची त्याचा विचार केला. मुलांनी मला एका जागेकडे नेले व म्हणाले, “आपण इथं एक मोट्ठा खड्डा करू अन् याच्यात गावातला कचरा टाकत जाऊ. लोकांना पण सांगू, इथेच कचरा टाका म्हणून. गाव स्वच्छय राहाते अन् खतंय बनते.”
***
अशा आणखी कित्येक नोंदी माझ्या शालेय दैनंदिनीत आहेत. तीन गावातील शाळांच्या या नोंदी आहेत. मुलांना काम करणे किती आवडते! मुले मला सातत्याने हे करू का, ते करू का विचारीत असतात. काम करू दिले नाही तर काही मुलांचे लक्ष गणित, मराठी वगैरे विषयांच्या अभ्यासाकडे लागत नाही. काम करून त्यांचे मन भरले किंवा थकले तर शांतपणे गणित, मराठीचा अभ्यास करीत बसतात. काम करण्यातून आनंद मिळतो. तो आनंद मुले अनुभवतात आणि म्हणून त्यांना काम करायला आवडते. हा आनंद कोणता? तर तो निर्मितीचा आनंद असतो. झाडू मारायला देखील मुलांना आवडते कारण त्यातून स्वच्छतेची निर्मिती होते. काम करणे ही नुसती मेहनत नसते. त्यातून काही तरी निर्माण होत असते म्हणून मुलांना वर्गात बसून अभ्यास करण्यापेक्षा काम करणे अधिक आवडते.

कामातून मुलांच्या अभिव्यक्तीस वाव मिळतो. म्हणजे ज्याचा ज्याकडे कल असतो ते काम करण्यास मुले प्राधान्य देताना दिसतात. कामाचे अनेक प्रकार आहेत. अंगमेहनतीची कामे म्हणजे खोदणे, तोडणे, ठोकणे, उपसणे, ओझे उचलणे, माती टाकणे, झाडून काढणे, झाडे लावणे वगैरे. कलात्मक वस्तू तयार करणे हे देखील कामच. बिघडलेली यंत्रे (साधी यंत्रे, गुंतागुंतीची यंत्रे) दुरूस्त करणे, मातीच्या, बांबूच्या, धातूच्या वस्तू तयार करणे, विणणे, शिवणे अशी कामांची कितीतरी मोठी यादी होईल. आपापल्या आवडीनुसार कामे करत असताना आनंदाची प्राप्ती होत असते. आनंदामुळे मन प्रसन्न राहते. प्रसन्न मनातून चांगले विचार प्रवाहित होतात.

काम करणे म्हणजे स्वतःचे डोके चालविणे. शाळेतून काम करणे बंद झाले म्हणून मुलांचे अभ्यासात डोके चालणे बंद झाले. वर्गात मुलांना थिअरी शिकविली जाते. काम केल्याशिवाय थिअरी जन्म घेत नाही. आधी कार्य केले जाते नि मग त्या संदर्भाने दुसऱ्यांना माहिती मिळावी यासाठी ते लिहून ठेवले जाते. आपण मुलांना कार्य न करू देता ती माहितीच डोक्यात कोंबण्याचा प्रयत्न करतो म्हणून समस्या निर्माण झाल्या. अभ्यासाच्या नावाखाली केवळ गुरूजी सांगतात ते ऐकणे, प्रश्नांची उत्तरे देणे, स्वाध्याय सोडविणे, पाठांतर करणे, प्रश्नोत्तरे वहीत लिहिणे, स्वाध्यायपुस्तिका सोडविणे किंवा भरणे एवढेच चालते. म्हणून मुलांचे मन वर्गात रमत नाही. आणि शिक्षक जीव तोडून शिकवत असूनही कित्येक मुलांना ते समजलेले दिसत नाही.

काही दिवसांपूर्वी ‘शिक्षकांची अशैक्षणिक कामातून सुटका’ अशी बातमी वाचली. शिक्षण विभागाने निर्णय घेऊन शिक्षकांची अशैक्षणिक कामातून सुटका करण्याचे ठरविले जेणेकरून शिक्षकांना संपूर्ण वेळ मुलांसोबत वर्गात घालविता येईल व गुणवत्ता वाढविता येईल. या बातमीत अशैक्षणिक कामांची जी यादी दिली होती त्यात शालेय पोषण आहार शिजविणे व हिशेब ठेवणे, शालोपयोगी वस्तूंचे वाटप करणे, शाळा बांधकाम करणे, गावातील निरक्षर मोजणे व त्यांना साक्षर करणे वगैरे कामांना अशैक्षणिक कामे म्हटले होते. खरे तर ही कामे म्हणजे संधी आहे मुलांच्या शिकण्याची. ही कामे शिक्षकांनी एकटयाने केली तर ती अशैक्षणिक कामे आहेत परंतु हीच कामे मुलांना सोबत घेऊन केलीत तर ती शैक्षणिक कामे होतात. काम म्हणजे प्रात्यक्षिक. काम म्हणजे मूर्त ज्ञान. मूर्तातून अमूर्ताकडे जाण्यासाठी प्राथमिक शिक्षण हे पूर्णपणे कामातून आणि कृतीयुक्तच हवे तेव्हाच मुले मग थिअरी जाणून घेण्यास तयार होतील आणि मोठमोठी पुस्तके अभ्यासू शकतील. ज्ञान विकसित होण्यासाठी आणि सामाजिक जाणीव निर्माण होण्यासाठी या पायऱ्यांनी शिक्षण होणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

अलीकडे माणसांना काम करणे आवडत नाही व माणसे जरा आळशी झालेली दिसतात. याचे कारण शोधले तर त्याचे मूळ आपल्या शिक्षण पद्धतीत सापडते. मूल शाळेत दाखल झाल्यापासून दहा ते पंधरा वर्षे शिक्षण घेताना दिवसभर वर्गात बसलेले असते आणि शिक्षकांचे शिकविणे ऐकत (?) असते. हातापायांना काहीच काम नसते. शाळेत सहा ते सात तास अशी दहा ते पंधरा वर्षे घालविल्यावर माणसांना बैठेपणाच आवडू लागला तर यात नवल ते काय? आणि ऐन धडपडीचा एवढा मोठा काळ एका जागी बसून काढल्यामुळे कितीतरी समस्या निर्माण होतात मुलांमध्ये. त्यातच आरोग्याची समस्या देखील! मुलांमधील चुस्ती-फुर्ती नष्ट झालेली दिसून येते. शरीर आणि आरोग्य सुस्थितीत राहण्यासाठी अंगातून घाम निघणे अत्यंत आवश्यक असते. तो एकतर खूप खेळल्याने निघतो किंवा शारीरिक मेहेनत केल्याने निघतो. शरीरातून घाम निघाल्याने नको असलेले घटक घामावाटे निघून जातात व रोग प्रतिकारक शक्ती सुस्थितीत राहते. मात्र आपल्या शिक्षणपद्धतीमुळे खेळणे आणि काम करणे या दोन्ही गोष्टी जवळपास हद्दपार झाल्या व मुलांच्या शरीरातून घाम गळणे बंद झाले

कामाचे महत्त्व एवढेच नाही. काम करताना मुले त्यात बुडून जातात. त्यांची जणू समाधी लागते. एकांतता अनुभवास येते. मी कित्येकदा अनुभवलेय की मुलांचे काम पूर्ण होत नाही तोपर्यंत त्यांचे लक्ष दुसरीकडे कुठेच वळत नाही. काम करताना त्यात ती एकदम गुंग झालेली असतात. सुट्टी झाली तरी कामच करत असतात आणि हीच मुले सुट्टी झाली तरी गणित भाषा वगैरे विषयांचा अभ्यासही करत बसतात.

तंत्रज्ञानाच्या या युगात मुले आता हाताने काम करणे विसरून गेली आहेत किंवा विसरून जातील असेही काहींना वाटते. मात्र असे वाटण्याचे काही कारण नाही. मुलांना आताही कामच करायला आवडते. याचे अगदीच अलीकडचे मी अनुभवलेले

उदाहरण म्हणजे, मागील काही दिवसांपासून मला माझी स्वतःची अन् बाहेरची सगळी मुले कसलेसे वायर बाजारातून आणून काहीतरी विणताना दिसत होती. मी विचारणा केली तर कळले ती सगळी ‘स्कूबीज’ विणत होती. मी विचारले, “तुम्हाला कोणी शिकविले?” तर उत्तर आले, “इंटरनेटवरून शिकलो” मला फार आश्‍चर्य आणि कौतुक वाटू लागले. कारण प्रायमरीपासून ग्रॅज्युएशनपर्यंतची आणि शहरापासून खेडयापर्यंतची सारी मुले टीव्ही, मोबाईल सोडून ‘स्कूबीज’ विणत होती. आपल्या खाऊच्या पैशातून वायर विकत घेत होती. याचा अर्थ मुलांना आताही काम किंवा कृतीच आवडते.

काम करणे ही माणसाची मूळ वृत्ती आहे. त्यामुळे ती नष्ट होऊ शकत नाही. आपण सध्या ती थांबवलेली आहे एवढेच. या पृथ्वीवर माणूस जन्माला आल्यापासून ते आतापर्यंत हा जो विकास आपण बघतोय तो प्रत्यक्ष कामाचा, मेहनतीचा परिपाक आहे. ‘करून पाहणे’ हे माणसाच्या जिज्ञासू वृत्तीचे लक्षण आहे. मात्र आपल्या शिक्षणात ही मूळ जिज्ञासू वृत्ती जोपासण्यास स्थान नाही. आणि शिक्षणात नाही म्हणून समाजातही नाही. जिज्ञासू वृत्तीचा नाश झाल्यामुळेच माणसाची बुद्धिमत्ता मर्यादित विचार करू लागली. माणसामध्ये दैववाद स्थिर झाला. दैववाद स्थिर झाल्यामुळे वैज्ञानिक दृष्टी निर्माण झाली नाही व माणसे अंधश्रद्धा, कर्मकांड यात गुरफटली. काम न करता केवळ पुस्तके वाचून वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण होणे व त्याचा परिपोष होणे शक्य नाही. काम करून शिकणे यास पर्याय नाही. आणि त्यातही कामाच्या निवडीचे स्वातंत्र्य हवे शाळेत मुलांना. कारण स्वतः स्वीकारलेले किंवा निवडलेले काम करताना माणूस चिकित्सा करतो व चिकित्सेतूनच विज्ञानवादी बुद्धी विकसीत होते. आपल्याला जर विज्ञाननिष्ठ समाज हवा असेल तर आपल्या शिक्षणाच्या संकल्पना बदलाव्या लागतील. शिवाय जेव्हा शाळेत मुले काम करत शिकतील तेव्हा श्रमाचे महत्त्व, श्रमाचे मूल्य व श्रमप्रतिष्ठा वाढेल. आणि कामाच्या बाबतीत हलक्या दर्जाचे, श्रेष्ठ दर्जाचे असा भेद उरणार नाही. तेव्हाच समानतेच्या दृष्टीने पाऊल पुढे पडेल.

वैशाली गेडाम
gedam.vai@gmail.com
8408907701

# विचार करून पाहू - शिस्त कशाशी खातात?

नीलिमा गोखले, मंजिरी निंबकर

“आमचा श्रेयस ना अजिबात ऐकत नाही.” किंवा “वृंदा भारी हट्टी आहे.” अशा तक्रारी कोणत्याही बालवाडीच्या पालक सभेमध्ये हटकून ऐकू येतात. बरेचदा अशा तक्रारी वैतागून केलेल्या असतात. पण कधी कधी त्यात कौतुकाचा सूरही असतो. बालवर्गातील मुले पुष्कळदा एखादी वस्तू हवी म्हणून हट्ट करतात. टीव्हीवर आपला आवडता कार्यक्रम बघत असल्यास वारंवार जेवायला बोलावूनही उठतच नाहीत. यालाच आपण हट्टीपणा म्हणतो. हट्टीपणा ही काही वैकासिक गोष्ट नव्हे की जी कालांतराने मूल मोठे झाल्यावर आपसूक नाहीशी होईल. म्हणूनच मुलांच्या या सवयीकडे गंभीरपणे पाहिले पाहिजे. योग्य काय आणि अयोग्य काय हे मुलांना आपण पालक किंवा शिक्षक या नात्याने लवकरात लवकर म्हणजे मूल अगदी तान्हे असल्यापासून शिकवायला हवे. योग्य/अयोग्यच्या संकल्पना या समाज व संस्कृती-सापेक्ष असतात. यालाच आपण थोडक्यात ‘शिस्त’ म्हणतो.

शिस्त या शब्दाचा शब्दकोशातला अर्थ आहे, नियमानुसार वागण्यास शिकणे. म्हणजे प्रत्येक समाजाला मान्य असणारे वागणुकीचे नियम शिकणे. त्याचे मुलांना उपजत ज्ञान नसते. चालायला शिकणे, वस्तू उचलून तोंडात टाकणे इ. गोष्टी

मुलांना उपजत येतात. परंतु भाषा, शिस्त अशा गोष्टी मुद्दाम शिकाव्या लागतात.

ही शिस्त मुले कशी शिकतात? अर्थातच आजूबाजूच्या मोठ्यांचे किंवा इतर मुलांचे अनुकरण करून किंवा अनुभवातून. मुलाने खेळून झाल्यावर खेळ आवरून ठेवला की ताई त्याला शाबासकी देतात, तेव्हा मूल आवरून ठेवायची शिस्त शिकते. समाजमान्य नियम शिकायचे तर मुलांच्या अवतीभोवती ते नियम स्वतः पाळणारे व पाळायला शिकवणारे लोक हवेत. मुलांकडून काय अपेक्षित आहे आणि का हे त्यांना स्पष्ट सांगितले पाहिजे. मुलाने खेळ आवरल्यावर नुसतेच "वा वा छान!" असे न म्हणता "तू खेळ आवरलास हे मला फार आवडले" हे सांगितल्यावर मुलांना आपल्याकडून नक्की काय अपेक्षा आहे ते कळते.

शिस्त शिकण्याची सुरुवात रोजच्या दैनंदिन व्यवहारातून होते. सकाळी उठणे, शाळेसाठी तयार होणे, वेळच्या वेळी जेवण करणे, ठराविक वेळेला झोपणे या गोष्टींची एक ठरलेली वेळ असली की मुलांना त्याची सवय होऊ लागते. पालकांच्या किंवा कुटुंबातील इतर प्रौढांच्या सोईनुसार ही वेळ बदलता कामा नये. पाहुणे आले किंवा घरी काहीतरी कार्यक्रम असला तरी मुलांची जेवणे वेळच्या वेळी झाली पाहिजेत. तसेच मुले त्यांच्या रोजच्या वेळी झोपी गेली पाहिजेत. कालांतराने हा नित्यक्रम मुले आत्मसात करतात आणि त्यांची वागणूकही नियमबद्ध होऊ लागते. हे स्वनियंत्रण पुढे त्यांना अभ्यासात आणि परीक्षेची तयारी करताना उपयोगी पडते. समाजात प्रौढ म्हणून वावरताना वेळेवर कामाला जाणे, वाहतुकीचे नियम पाळणे यासारखे नियमबद्ध वर्तनही लहानपणी शिकलेल्या स्वनियंत्रणातूनच शक्य होते.

पालक म्हणून आपण काय करू शकतो?
मुलांना शिस्त लावण्याची सुरुवात स्वतःला शिस्त लावण्यापासून होते. नित्यक्रम पाळणे, वेळ पाळणे, प्रामाणिक असणे, नियम पाळणे, इतरांशी नम्रपणे बोलणे, सहानुभूती व्यक्त करणे इत्यादी गोष्टी मुलांच्या वागण्यातून आपल्याला दिसायला हव्या असल्या तर त्या प्रथम आपल्या वागण्यातून मुलांना दिसायला हव्यात.

मुलांना घालून दिलेले नियम पाळण्यामध्ये सातत्य असायला हवे. तुम्ही काय करता आहात व ते का करता आहात हे मुलांना नीट समजावून द्यायला हवे. उदा. "चल, जेवायच्या आधी आपण साबणाने हात धुवूया. म्हणजे हातावरची घाण आणि जंतू पोटात जाणार नाहीत आणि आपण आजारी पडणार नाही." इथे हात धुतले पाहिजेत या सांगण्याबरोबर हात धुण्याची कृती आणि त्या कृतीमागची भूमिका स्पष्ट करून सांगितली आहे. मुले स्वतःहून न सांगता नियम पाळायला लागण्याआधी बरेचदा त्यांना पुन्हा पुन्हा आठवण करून द्यावी लागते. या काळात हुकुम सोडण्यापेक्षा शक्यतो मुलांना बरोबर घेऊन हे काम करावे.

दर वेळी "तू पटकन दूध पिऊन टाकलेस तर तुला चॉकोलेट देईन" किंवा "हात नाही धुतलेस तर फिरायला नेणार नाही" अशी 'बक्षीस अथवा शिक्षा' पद्धती मुलांना शिस्त लावण्यास फारशी उपयुक्त ठरत नाहीत. त्यापेक्षा आपण जे काही करतो त्याचे परिणाम समजून घेण्यास मुलांना मदत करा. जसे, त्याने दुसऱ्या मुलाची एखादी वस्तू तोडली तर त्याला स्वतःची एक वस्तू दुसऱ्या मुलाला द्यावी लागेल. इथे फक्त सॉरी म्हणून भागणार नाही हे मुलांना समजले पाहिजे.

कधी कधी मुलांसमोर पर्याय ठेवणे उपयुक्त ठरते. उदा. झोपायला जाण्याआधी एखादे मूल जर चॉकलेटसाठी हट्ट करीत असेल तर शांतपणे पण ठामपणे सांगा, "तुझ्याकडे दोन पर्याय आहेत. एक तर तू कितीही रडलास तरी तुला चॉकलेट

मिळणार नाही. तेव्हा तू रडू शकतोस. दुसरा पर्याय म्हणजे आता झोपायला जा आणि उद्या दुपारच्या जेवणानंतर तुला चॉकलेट मिळेल.” आणि सांगितल्याप्रमाणे दुसऱ्या दिवशी जेवणानंतर त्याला चॉकलेट द्यायला मात्र विसरू नका.

मुलांची एक समज निर्माण होईपर्यंत त्यांच्याशी बोलणे हे वेळखाऊ असते. परंतु त्याचा परिणाम जास्त काळ टिकणारा असतो. शिवाय या प्रक्रियेत मुले स्वतः विचार करायला आणि निर्णय घ्यायला शिकतात. लहान मुलांना शिस्त शिकविण्याच्या या कामात काहीही झाले तरी दोन गोष्टी टाळायला पाहिजेत. त्या म्हणजे मुलांवर ओरडणे आणि त्यांना मारणे. यातून मुले फक्त एकच गोष्ट शिकतात. ती म्हणजे हिंसा. रागावणे आणि मारणे यातून असा संदेश त्यांना मिळतो की ज्याच्या हातात सत्ता तो आपल्याला हवे ते करू शकतो. त्यामुळे एखाद्याचे आपल्याला पटले नाही तर मुले त्याला पटकन मारतात. ही मुले पालक झाली की ती आपल्या मुलांना मारतात. कारण शिस्त लावण्याचा एवढा एकच मार्ग त्यांना ठाऊक असतो.

मुलांच्या घरच्या जीवनातला एक महत्त्वपूर्ण घटक म्हणजे त्यांचे विस्तारित कुटुंब. बरेचदा आजी-आजोबा, काका-काकी सर्वजण एकाच घरात राहतात. मुलांच्या वागणुकीबद्दल वेगवेगळ्या प्रौढांच्या वेगवेगळ्या अपेक्षा असतात आणि अयोग्य वागणूक सुधारायची कशी याच्या पद्धतीही निरनिराळ्या असतात. उदा. रात्रीच्या जेवणाची वेळ झाली आहे. आईने जे संपूर्ण कुटुंबासाठी बनवले आहे ते खायची मुलाची इच्छा नाही. ते मोठ्याने रडून गोंधळ घालते आणि जेवणार नाही असे जाहीर करते. बरेचदा कुटुंबातील एखादी प्रौढ व्यक्ती (आई सोडून इतर) मुलाची समजूत घालते आणि त्याच्या अवास्तव मागण्यांसमोर हार मानते. “अगं दे त्याला दूध तो म्हणतोय तर.” असे मुलासमोरच आईला सांगितले जाते. असे अनुभव जेव्हा पुन्हा पुन्हा येतात तेव्हा मूल आईचे आधिपत्य झुगारून आणि नियमांकडे दुर्लक्ष करून आपल्याला हवे ते मान्य करून घेण्यास शिकते. मूल लहान असते आणि आपल्या भावनांवर नियंत्रण ठेवण्यास असमर्थ असते परंतु प्रौढ तर पुढचा विचार करूच शकतात ना! त्यांनी तरी आपल्या कृतीचे दूरगामी दुष्परिणाम लक्षात घ्यायला हवेत. घरातील सर्वांनी मिळून घराचे नियम ठरवावेत आणि ते पाळावेत.

नीलिमा गोखले
neelima.gokhale@gmail.com
9823053272

मंजिरी निंबकर
manjunimbkar@gmail.com
9822040586

# जस्ट पिन इट!

आपल्या ऑफिसमध्ये, शाळेतल्या वर्गात (क्वचित घरातही) कुठेतरी एखादा पिनबोर्ड असतो. त्यावर आपण भेटकार्डे, चित्रे, करायच्या कामांची यादी, वेळापत्रक, महत्त्वाचे फोननंबर इत्यादी डकवून ठेवलेले असतात. हवे तेव्हा आपण ते जाऊन पाहू शकतो, काढून टाकू शकतो आणि नवीन लावूही शकतो. अर्थात हे असे सतत पिनबोर्डवर काहीतरी लावून ठेवणे हा आपल्या संस्कृतीचा भाग कधीच नव्हता. मात्र सुरळीत कामकाजासाठी ही सवय फार उपयुक्त आहे असे ते वापरणारे सांगतात.

इंटरनेट वर सर्फिंग करता करता उपयुक्त वाटलेली एखादी वेबसाईट किंवा ब्लॉग किंवा व्हीडिओ नंतर परत पहायचे असतील तर आपण काय करतो? लिंक स्वतःला इमेल करतो किंवा आपल्या संगणकावर बुकमार्क करून ठेवतो. पण यापेक्षा, आपल्याला जे जे आवडले ते पटकन एखाद्या व्हर्च्युअल किंवा आभासी पिनबोर्डला डकवून ठेवता आले तर काय बहार!! ही मोठ्ठी सोय आपल्यासाठी करून ठेवली आहे www.pinterest.com ने.

हल्ली आपण कोणतेही वेबपान उघडले की ते शेअर करण्याचे काही पर्याय मिळतात. फेसबुक, ट्विटर, गूगल प्लस इत्यादी पर्यायांच्या जंत्रीमध्ये २०१० पासून अजून एक नाव समाविष्ट झाले ते म्हणजे पिंटरेस्ट. छोट्या लाल रंगाच्या गोलामध्ये पांढऱ्या रंगाचे पिनसारखे दिसणारे इंग्रजी p अक्षर, 'Pin it' किंवा थोडक्यात 'डकवा मला बोर्डवर' असे म्हणत आपल्याला खुणावत असते. आपण नव्या विषयाचा नवा बोर्ड तयार करू शकतो किंवा जुन्याच एखाद्या बोर्डवर नवी भर घालू शकतो. उदा. सातवीच्या वर्गात इंग्रजीसाठी करून पहायचे उपक्रम असा माझा आधीचा बोर्ड आहे. त्याच बोर्डवर मला नवीन सापडलेल्या एखाद्या उपक्रमाची वेबसाईट पिन करून ठेवता येईल. म्हणजे हवे तेव्हा मी साठवलेले सगळे उपक्रम एकत्र, एका जागी पाहता येतील. मित्रमैत्रिणी, शिक्षक गट, कुटुंब यांना एकत्रित पिनबोर्डसुद्धा बनवता येतात.

हा आपला बोर्ड स्वतःपुरताच ठेवायचा का जगाला पाहायला खुला करायचा हेही आपण ठरवू शकतो. अनेकांनी तो खुला ठेवला आहे आणि हीच आहे पिंटरेस्टची जमेची दुसरी बाजू. कारण लोकांनी विषयानुसार बनवून ठेवलेल्या बोर्ड्सचा आपल्यालाही खूप उपयोग होऊ शकतो.

मात्र आपला बोर्ड बनवणे किंवा इतरांचे बोर्ड पाहणे या दोन्हींसाठी तत्पूर्वी आपण पिंटरेस्टचे सभासद असणे आवश्यक आहे. इमेल अकौंट असणारा कुणीही विनामूल्य सभासद होऊ शकतो. सभासद झाल्या झाल्या पिंटरेस्ट आपल्यासाठी एक दालन खुले करते आणि म्हणते, "फार विचार नका करू. इथे असलेल्या विषयांपैकी ज्यात तुम्हाला रस आहे (whatever catches your eye), ते निवडून मोकळे व्हा. बाकी फाइन ट्यूनिंग नंतर करता येईल." समजा आपण अध्यापन, पालकत्व, मांजराची पिल्ले, ट्रेकिंग, फोटोग्राफी इत्यादी ४-५ विषय निवडले की त्या त्या विषयातले इतर लोकांचे बोर्ड्स आपल्याला पाहण्यासाठी खुले होतात. पिंटरेस्ट स्वतःची ओळखच मुळी 'A place to discover ideas for all your projects and interests, hand-picked by people like you' अशी करून देते. अगदी खरे आहे हे! लोकांनी व्यवस्थित संशोधन करून त्यांना आवडलेल्या गोष्टींनी सजवून ठेवलेले बोर्ड आयते पाहायला, वापरायला मिळतात आपल्याला. आणि त्यातल्या आपल्याला आवडलेल्या गोष्टी पुन्हा आपल्या बोर्डवरही लावता येतात. और क्या चाहिए!

मधुरा राजवंशी
rmadhuraa@gmail.com
8275369702